ANNASAHEB AWATE COLLEGE, MANCHAR

*'Education through self help is our motto' - Karmaveer*

Rayat Shikshan Sanstha's

# Annasaheb Awate Arts, Commerce and Hutatma Babu Genu Science College, Manchar, Dist.-Pune.

NAAC Re-Accrediated–'A Grade'



## National Conference

on

**Self Reliant India : Reality, Opportunities and Challenges**

Organized by

## Department of Economics

## CERTIFICATE

*This is to certify that Mr./Mrs.* Tansen Yadavrao Randive

*from* Annasaheb Awate College, Manchar

*has Participated/ ~~Chaired a session/ as a resource person~~/ presented paper entitled*

आत्म निर्भर भारतासाठी लोकशाही व नागरी समाज

*in the conference organized by the Department of Economics. during 11th and 12th February 2021*

| | | |
|---|---|---|
| Dr. Smt. S.R. Chavan | Prof. G.C. Wagh | Dr. K.G. Kanade |
| Co-ordinator | IQAC Co-ordinator | Principal |

Scanned with CamScanner

ANNASAHEB AWATE COLLEGE, MANCHAR

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - I January - March - 2021

ENGLISH / MARATHI / HINDI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

76

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आत्मनिर्भर भारतासाठी उद्योजगता शिक्षणाची भूमिका<br>**श्री. भोये चंद्रकांत मुरलीधर** | १-५ |
| २ | भारतीय कृषी अर्थव्यवस्था : आत्मनिर्भरतेकडे एक वाटचाल<br>**प्रा. डॉ. बिराजदार एस. एम.** | ६-९ |
| ३ | आत्मनिर्भयतेसाठी भारतामधील हरितक्रांतीचे योगदान<br>**प्रा. डॉ. गव्हाळे बी. व्ही.** | १०-१७ |
| ४ | आत्मनिर्भर भारत अभियान : परिणाम व आव्हाने<br>**प्रा. डॉ. अविनाश रामलाल निकम** | १८-२४ |
| ५ | भारताची सध्याची आर्थिक स्थिती आणि १९९१ चे आर्थिक संकट<br>**प्रा. डॉ. रहाणे शोभा तुकाराम** | २५-३० |
| ६ | भारत-चीन संबंध आणि आत्मनिर्भर भारत<br>**प्रा. डॉ. सुपेकर वैशाली प्रशांत** | ३१-३४ |
| ७ | भ्रष्टाचाराला आळा - डिजीटल इंडिया : कोविड-१९ च्या महामारी व त्यापुढील काळातील संधी<br>**डॉ. विकास वैजिनाथ टाचले** | ३५-३९ |
| ८ | आत्म-निर्भर भारतासाठी आत्म-निर्भर विद्यार्थी<br>**डॉ. एस. आर. चव्हाण**<br>**एम. आर. हिवाळे** | ४०-४२ |
| ९ | डिजिटल भारत आणि महिला सक्षमीकरण<br>**कु. संगिता साहेबराव बोरसे** | ४३-४६ |
| १० | आत्मनिर्भर भारत बनविण्यास शारीरिक शिक्षण व खेळाची भूमिका<br>**प्रा. अभय शरदराव चांदेकर** | ४७-५१ |
| ११ | आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी शिक्षणाची भूमिका<br>**श्री. अशोक माहुरे** | ५२-५४ |
| १२ | आत्मनिर्भर भारतासाठी लोकशाही व नागरी समाज<br>**प्रा. तानसेन यादवराव रणदिवे** | ५५-५७ |




77

Scanned with CamScanner

ANNASAHEB AWATE COLLEGE, MANCHAR

VOLUME - X, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १२. आत्मनिर्भर भारतासाठी लोकशाही व नागरी समाज

प्रा. तानसेन यादवराव रणदिवे
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.

## प्रस्तावना

भारतीय लोकशाहीला अधिकाधिक आशयसंपन्न, समृद्ध दृढ करण्यात प्रसारमाध्यमे, भारतीय जनता, दबाव गट, नवसामाजिक चळवळी, संस्था, संघटना आणि अराजकीय घटकांचा वाटा महत्वपूर्ण ठरतो. यातील एक अराजकीय घटक म्हणजे नागरी समाज होय. भारत जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतीय लोकशाही प्राचीन भारतीय लोकशाही परंपरा व पाश्चिमात्य आधुनिक लोकशाहीचा समन्वय आहे. त्यामुळे भारतीय लोकशाहीत नागरी समाजाची भूमिका निर्णायक स्वरुपाची ठरते. भारताच्या संदर्भात नागरी समाजाचे स्वरूप व चरित्र हे वसाहतवादाच्या भारतातील विशिष्ट रूपाशी, इतिहासाशी संबंधित राहिले आहे. भारतीय लोकशाहीच्या संदर्भात नागरी समाजाची वाटचाल अभ्यासणे निकडीचे आहे. प्रस्तुत संशोधनात भारतीय लोकशाही व नागरी समाज यातील आंतरसंबंध अभ्यासने व जागतिकीकरणाच्या पर्वात नागरी समाजाची वाढते महत्व मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## नागरी समाज या संकल्पनेचा संक्षिप्त इतिहास

नागरी समाजाचा इतिहास पाहायचा झाल्यास पश्चिमेपासून सुरुवात करावी लागेल. नागरी समाजाची संकल्पना काळाच्या ओघात विकसीत होताना दिसते. प्राचीन काळी ग्रीक नगरराज्ये होती. प्लेटो, अरीस्टटाल वाङ्मय पाहिल तर city state हा राजकीय बांधणीचा एक प्रकार होता आणि ग्रीक नगरराज्यात माणसाचे पश्चिमेकडे सामुहिक राजकीय जीवन सुरु झाल्याचे दिसून येते. ज्यामध्ये नागरी सदगुण महत्वाचे ठरते. त्यानंतर थामस अक्विनन्सने 'सेवाभावाची' संकल्पना मांडली. ज्यामध्ये seven spiritual aids व seven good works ची संकल्पना मांडली. तदनंतर एका बाजूला republicanism आणि दुसऱ्या बाजूला सामाजिक कराराचे तत्वज्ञान आणि तिसऱ्या बाजूला राज्यसंस्थेचे प्रयोजन काय? याची चर्चा सुरु झाली. यामध्ये हॉब्स, लॉक, रुसो यांच्या विचारांची एक मोठी परंपरा आहे. विशेषतः जॉन लॉकने मांडलेल्या सिद्धांतात नागरी समाजाची चर्चा गंभीरपणे केलेली दिसते. लॉकच्या मते, नागरी समाज हा विचारक्षम असलेल्या माणसांनी निर्माण केला आहे. त्यामुळे लोकांची जोपर्यंत राज्यसंस्थेला मान्यता आहे तोपर्यंत राज्यसंस्था सार्वभौम आहे. हेगेलच्या मते माणूस हा नैतिक प्राणी आहे. त्याला नुसते जगावेसे वाटत नाही तर त्याला अर्थपूर्ण जगावेसे वाटते. एकंदरीत नागरी समाज हा एक अवकाश आहे. यामध्ये एका बाजूला राज्यसंस्थेचे क्षेत्र व दुसऱ्या बाजूला व्यक्तिगत जीवनाचे क्षेत्र त्यात मुख्यत्वे आपले कुटुंब, व्यक्तिगत जीवन ही दोन क्षेत्रे बाजूला ठेवलीत तर मध्ये जो सामाजिक अवकाश उपलब्ध असतो त्याला 'नागरी समाज' असे संबोधले जाते.



78

Scanned with CamScanner

**भारतीय लोकशाही व नागरी समाज**

भारतात आधुनिक नागरी समाजाच्या बांधणीची सुरुवात १९ व्या शतकापासून झाली. कारण भारतीय समाजात समता हे समाजधारणेचे तत्व पुढे येताना दिसते. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समता या दोन आधुनिक मुल्यांचा परिचय भारतीय माणसाला झाला. एकोणिसाव्या शतकात भारतात एका बाजूला धर्माचे प्रबोधन झाले व दुसऱ्या बाजूला समाजसुधारणेची चळवळ निर्माण झाली. हे धर्मसंप्रदाय आधुनिक मुल्यांचा आग्रह धरताना दिसतात. उदा. ब्राहमोसमाज, प्रार्थना समाज, वेद समाज, स्वामीनारायण संप्रदाय, सत्यमाधर्म इ. त्याचबरोबर समाजसुधारणा चळवळीने राष्ट्रवादाचे टप्पे येतात. यामध्ये विविध प्रवाह जहाल, मवाळ, गांधी आणि त्यानंतर पुढचे प्रवाह येतात. या दोन दिशेने भारतातील राष्ट्रवाद एकाच वेळेस विकसीत होताना दिसते. पार्थ चटर्जी यांनी नागरी समाज व राजकीय समाज अशी मांडणी केली आहे.राष्ट्रवादाची चळवळ सुरु झाली त्यातून राष्ट्रराज्याची सुरुवात झाली.

स्वतंत्र भारताची राज्यघटना निर्माण करण्याची १९४७ ला मतदान घेवून राज्यघटना समितीचे गठन करावे लागले. नवीन राज्यघटनेनुसार १९५२ ला पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. ज्यात सर्वांना प्रौढ मतदानाचा अधिकार देण्यात आला. सन १९६० मध्ये जेव्हा भारत- चीन , पाकिस्तान या युद्धामुळे भारतीय व शहरी व ग्रामीण भागामध्ये भुकेची तीव्रता जाणवत होती.त्यामध्ये भारतातील नागरी समाजाची भूमिका निर्णायक स्वरूपाची ठरू पाहत होती. त्यानंतर भारतीय राजकरणात आणीबाणी हा मैलाचा दगड ठरला जयप्रकाश नारायण( संपूर्ण क्रांति) व त्यांचं आंदोलन त्यानंतर लादण्यात आलेली आणीबाणी आणि पुढची जनता पक्षाची १९ महिन्यांची राजवट या घटनांनी भारतीय लोकशाहीचे आयाम बदलले जनता पक्षाचा प्रयोग यशस्वी होण्यासाठी नागरी समाजाचा अंकुश असेल, अशी जेपीची संकल्पना होती. मात्र हा पक्ष फुटला आणि जेपींच्या आंदोलनात स्वयस्फुर्तीने उतरलेल्या बहुतांशी तरुणांनी राजकारण वाईटच हा शिक्का मारून लोकांत जाऊन काम करण्याविणा पर्याय नाही अशी वैचारिक भूमिका घेतली. ही भूमिका अराजकीय होती आणि नंतरच्या तीन दशकांत राजकारण वाईट त्याला पर्याय प्रगल्भ व सजग नागरी समाजाचं असू शकते आस माणण्याकडे कल वाढत गेला. गांधीवादी व समाजवादी परिवरातील अनेक विचारवंतांनी या समाजाला वैचारिक पाठबळ पुरवलं.

**लोकशाही, जागतिकीकरण व नागरी समाज**

१९९१ नंतर जागतिकीकरणाच्या पर्वात नवमध्यमवर्ग जन्माला आला. भारतातील नागरी समाजाचे पुनरुथान थोड्या विस्कटलेल्या मार्गाने का होईना, सभ्य समाजाने समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न केला व लोकशाही अधिक सशक्त करण्यामध्ये त्यांची भूमिका महत्वाची ठरते. नागरी समाज हा शब्द प्रामुख्याने अन्ना हजारे, अरविंद केजरीवाल, किरण बेदी व प्रशांत भूषण यांच्या लोकपाल आंदोलनापासून अधिक चर्चिला गेला. काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर या नागरी समाजाचा अर्थात व स्वरुपात बदल झाला. नागरी समाज हा उत्तर औद्योगिक भांडवलशाहीत विकसित झाला. ज्याचा मुख्य आधार हा नवमध्यमवर्ग आहे. आणि पारंपरिक मध्यमवर्ग आणि नवमध्यमवर्ग यांचं चरित्र वेगळं आहे.औद्योगिक भांडवलशाहीच्या टप्प्यातला पारंपरिक मध्यमवर्ग कनिष्ठ



79

Scanned with CamScanner

वर्गाबद्दल कणव होती, सहानुभूती होती. मात्र आज परिस्थिति वेगळी आहे. आज जो नवमध्यमवर्ग आहे यांची भूमिका वंचित, शोषित पीडित समाज वर्ग आहेत त्याच्यान्शी माझे घेणे काय आहे? त्यामुळे भारतीय लोकशाहीला सामाजिक बधीरता निर्माण होताना दिसते. राज्यसंस्थादेखील धर्मनिरपेक्षतेच्या आग्रह धरताना दिसत नाही. एकप्रकारची समजभिमुखता कमी होताना दिसते. भारतातील वाढत्या नवमध्यम वर्गाचे अस्तित्व देखील सांस्कृतिक आणि सामाजिक दुभंगलेपणाचे आहे. त्याचा परिणाम म्हणून भारतात एक तिरपगडा, विस्कळीत आणि अन्याय नागरी समाज निर्माण होताना दिसतो.

**निष्कर्ष**

विश्वातील जवळपास सर्वच विकसीत राज्यात सभ्य समाज आपली भूमिका प्रभावीपणे बजावते. मात्र भारतात शिकलेले लोक राजकारनाप्रती उदासीन दिसतात. त्यामुळे राजकरणात अकार्यक्षम व अपात्र लोकांचे वर्चस्व स्थापन होत आहे. जे लोकशाहीला व्यवस्थित संचालित होवू देत नाही. नैतिक व मानवी मूल्यांच्या संरचना व संवर्धनासाठी प्रयत्न करावे लागतील. भ्रष्टाचार, धर्मवाद, जातिवाद फार मोठ्या प्रमाणात भारतीय लोकशाहीची धार बोथट करताना दिसतात. नागरी समजाच्या सक्रियतेवर लोकशाहीचे संचालन व यश अवलंबून आहे.

**संदर्भ**

१. धनागरे द.ता. (२००५), संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव, परगावकर प्रकाशन,पुणे.
२. सुमंत यशवंत (२०१८), प्रा. यशवंत सुमंत यांची तीन भाषणे, युनिक अकादमी, पुणे.
३. पी. साईनाथ (२०११),'नागरी समाजाचा मायावी स्वरूप' , युनिक अकादमी, परिवर्तनाचा वाटसरु, पुणे.
४. बाळ प्रकाश,' नागरी समाज हा राजकरणाला पर्याय नव्हे' लोकसत्ता, २० एप्रिल २०११.
५. देशपांडे राजेश्वरी,'समावेशक' लोकशाही घडविण्याचे आव्हान,महाराष्ट्र टाइम्स, ७ फेब्रुवारी २०१४.



८०

Scanned with CamScanner